# गतिमान संतुलन

**संपादक : दिलीप कुलकर्णी**

वर्ष : २ | सौर १ वैशाख, शके १९२५ | वार्षिक वर्गणी
अंक : ५ | (२१ एप्रिल २००३) | ३० रु.

## चिंतनिका

पर्यावरणवादी विचारांत सर्व सजीवांविषयीचा आदर आणि प्रेमभाव अत्युच्च स्थानीं आहे. पर्यावरण-संस्कृती ह्या ठिकाणी धर्माच्या निकट येते. पृथ्वीवरील ह्या सजीवतेचा अर्थ आणि वैशिष्ट्य तिच्या वैविध्यात सामावलेले आहे. विविधता टिकली, तरच सजीवता टिकणार आहे.

– *मिखाईल गोर्बाचेव्ह*

*(क्योतो, जपान येथील भाषण; २० एप्रिल १९९३)*

*उन्हाळा म्हणजे आंब्यांचा हंगाम. आणि हल्ली बहुतेकांच्या मनात 'आंबा म्हणजे हापूस' असंच समीकरण असतं. रस करायचा असेल, तरच ते एक 'पायरी' खाली उतरणार! रायवळ आंब्याला हात लावणं ही त्यांच्या दृष्टीनं अप्रतिष्ठा. अशांना हवा असतो फक्त 'देवगड-हापूस'. हा 'एक नंबरचा' आंबा मानला जातो. 'मुँहमांगा दाम' त्यासाठी मोजला जातो.*

*पण ह्या कलमी आंब्यांमुळे देवगडच्या पर्यावरणाची किती आणि कशी हानी होते आहे हे ठाऊक आहे आपल्याला? गेल्या वर्षी 'कलमीकरणाचा घातक अतिरेक' ह्या लेखात जी शास्त्रीय माहिती दिली होती, तिचा प्रत्यक्ष प्रत्यय ह्या सर्वोत्कृष्ट आंब्यांच्या प्रदेशात पाहायला मिळतो.*

*पुण्याच्या 'प्रयास' ह्या संस्थेनं देवगड तालुक्याचा अभ्यास करून एक विस्तृत अहवाल तयार केला आहे. त्यातील आंबा-बागायतीमुळे होणाऱ्या हानीविषयीचा भाग ह्या अंकात आभारपूर्वक प्रसिद्ध करीत आहोत.*

### च्या पर्यावरणाची हानी करणारा

# देवगड-हापूस!

**प्रयास (संसाधने व उपजीविका उपगट)**

गेल्या सुमारे ३५ वर्षांत देवगड तालुक्यातील जमीन वापराच्या पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदल झाला आहे. नव्याने वहितीखाली आलेली जमीन अत्यंत थोडी; परंतु, पिकाखालची जमीन आंबा- वा काजू-लागवडीखाली जाण्याचे प्रमाण मोठे असा प्रकार झाला आहे. ह्या बदलाचे आर्थिक वा पार्यावरणिक परिणाम वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

बदलांची ही प्रक्रिया सुरू होण्यास दोन गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत ठरल्या : (१) पडीक जमिनींवर फळबागा वाढवण्यास शासनाने दिलेले प्रोत्साहन; आणि (२) संपामुळे मुंबईतील गिरण्या बंद पडून पुन्हा गावांकडे परतलेले चाकरमाने.

१९९० मध्ये महाराष्ट्र-शासनाने लहान शेतकऱ्यांसाठी रोजगार-हमी योजनेअंतर्गत एक योजना जाहीर केली. तीनुसार पडीक जमिनींवर फळबागा वाढवण्यास अनुदान मिळणार होते. ह्यातून गरीब शेतकरी वा भूमिहीन शेतमजूर ह्यांना रोजगार वा उत्पन्न मिळावे असा हेतू होता. आता गंमत अशी की, महसूल खात्याच्या नोंदीनुसार जंगले असलेली निजी जमीन ही 'पडीक' होती. त्यामुळे ती ह्या योजनेखालील लागवडीसाठी मान्य होती. मात्र ह्याचा परिणाम असा झाला की, ही 'पडीक' जमीन 'उत्पादक' बनवण्यासाठी डोंगर-उतारांवरील जंगले 'साफ' करण्यात आली. गिरणी-संपामुळे कापड गिरण्या बंद पडून अनेक चाकरमाने आपापल्या गावीं परत आले होते. त्यांना हातात रोकड बाळगण्याची सवय होती. घरी आल्यावर पोटापुरते भात-नाचणी-वरी पिकवणे हे त्यांच्या संकल्पनेत बसण्यासारखे नव्हते. आंबा/काजूची लागवड ही हातात रोख रक्कम येण्याचा आकर्षक उपाय होता. शासकीय निर्णयाने बागायतीकरणाच्या ह्या प्रक्रियेला गती मिळाली.

पण ही प्रक्रिया डोंगर उजाड होण्यास कारणीभूत झाली. आंबा-लागवडीसाठी डोंगरांचे उतार अगदी साफ केले जाऊ लागले. वणव्यांच्या भीतीने कलमांच्या मधील झुडुपे किंवा गवतही 'साफ' होऊ लागले. ह्यामुळे माती उघडी पडली; कडक ऊन, जोराचे वारे आणि तुफानी पाऊस ह्यांच्यामुळे धुपू लागली. कलमांची वाढ होऊन त्यांचे पुरेसे आच्छादन तयार होण्याआधीच्या पहिल्या चार-पाच वर्षांत ह्या धुपेचे प्रमाण अधिक असते.

* * *

हापूस आंब्याला एक वर्षाआड फळे येतात. त्या जातीची ही 'त्रुटी' दूर करण्यासाठी; तसेच, दरवर्षी अधिकाधिक रोकड मिळण्याच्या हव्यासापोटी 'वृद्धिरोधक संप्रेरकां'चा वापर शेतकऱ्यांनी सुरू केला. त्यामुळे पालवी फुटून झाडाची वाढ होण्याऐवजी दरवर्षी मोहरच फुटू लागला. फुले आणि फळांच्या विविध टप्प्यांवर 'भरघोस पिका'साठी म्हणून टनावारी कीटकनाशके फवारली जात होतीच. ह्या साऱ्या खते-कीटकनाशके-संप्रेरके ह्यांच्यामुळे आर्थिक आणि पार्यावरणिक धोके वाढले. खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जलस्रोतांचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झाले.

आर्थिक धोका वाढण्याची कारणे दोन : (१) वाढता खर्च आणि (२) भावाची कोणतीही हमी नसणे. खते, कीटकनाशके, संप्रेरके ह्यांच्यावरचा खर्च दरवर्षी वाढत आहे. तरीही किडींचा प्रादुर्भाव वाढतोच आहे. पीक मिळणे बेभरवशाचेच आहे. बड्या बागायतदारांना हा खर्च परवडतो. पण, कर्ज काढून खर्च करणारे छोटे बागायतदार मात्र त्याच्या सापळ्यात अडकत आहेत. इतका खर्च करून माल मुंबई-पुण्याच्या बाजारात पाठवावा, तर अमूक इतके उत्पन्न मिळेल ह्याची खात्री नाही. दलाल देईल ती रक्कम मुकाट्याने स्वीकारून गप्प बसायचे.

हे आर्थिक आणि पार्यावरणिक धोके हे देवगड तालुक्यातील भावी सामाजिक आणि पार्यावरणिक महासंकटाचे अग्रदूतच तर नाहीत?

* * *

आंबे-काजूंच्या मागे लागण्यामुळे देवगडातील शेती-उत्पन्नावर विपरीत परिणाम झाला आहे. पूर्वी छोटे शेतकरी स्वत:पुरेशी भरड आणि गळिताची धान्ये पिकवीत. आता त्यांची विविधता घटली आहे. हळद, मिरच्या, तीळ, ऊस ही पिके तीस वर्षांपूर्वी घेतली जायची. आता त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. पूर्वी त्यांना घरचे भात वर्षभर पुरायचे. आता, एकरी उत्पादन वाढूनही, ते जेमतेम ६-८ महिने पुरते. त्यामुळे, आता त्यांना बाजारातून धान्य विकत घ्यावे लागते. त्यासाठीचा रोख पैसा आंबे वा काजू विकून मिळवावा लागतो. पण ते उत्पन्न घटणारे आणि बेभरवशाचे आहे.

सारांश बडे बागायतदार सोडले तर छोट्या व सीमान्त शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही सारी व्यवस्था अशाश्वत भवितव्याची बनली आहे.

* * *

देवगड तालुक्यातील आकडेवारी असे दर्शविते की, एका घरामागे (५ माणसे) असणारी सरासरी जमीन ३.२५ हेक्टर आहे. पैकी २.७३ हेक्टर पडीक आहे. (प्रामुख्याने डोंगर-उतारावरची.) त्यामुळे आंबा-लागवड करून ती उत्पादक बनवणे हा आकर्षक पर्याय आहे. त्या मालाला बाजारात मिळणारा चांगला दर हे दुसरे आकर्षण. पण पडीक जमिनीतून पैसा करण्याच्या संधीचे हे बलस्थानच भविष्यात देवगडचे मर्मस्थान ठरणार काय?

* * *

इतिहासाने आपल्याला हे दाखवून दिले आहे की, अनेक सभ्यतांनी त्यांच्या उच्चतम समृद्धीच्या स्थितीत असतानाच, अशाश्वत पार्यावरणिक आणि विषमतापूर्ण सामाजिक पद्धतींच्या रूपाने आपल्या विनाशाची बीजे रोवली. हे विशेषेकरून घडले शेतीच्या बाबतीत. आजची एकेरी नगदी पिकांची आणि निर्यातभिमुख शेती-उत्पादनाची पद्धत भरघोस समृद्धीचे आमिष दाखवून आकर्षून घेणारी आहे हे खरे; पण तीच आपल्याला अतिविषम समाज आणि अवनत पर्यावरण ह्यांच्याकडे घेऊन जाणार का? असे असेल, तर भविष्यातील सर्वनाशाची फार मोठी किंमत आपण आजच्या समृद्धीसाठी मोजत आहोत.

* * *

*वाचकहो! हा अहवाल वाचल्यावरही आपण 'तिकडे देवगडचं काही का होईना—आम्हांला हापूस आंबे भरपूर खायला मिळाले म्हणजे झालं' असंच निगरगट्टपणे म्हणणार का? हापूसच्या हव्यासामुळे पर्यावरणाची होणारी ही हानी सार्वत्रिक आहे : अभ्यास व अहवाल देवगडविषयीचा असला, तरी सर्व रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांत हीच स्थिती आहे. मग, ती सुधारावी म्हणून आपण काय करू शकतो? आपण हापूसचा हव्यास सोडला, तरच ह्या परिस्थितीत काही सुधारणा संभवते.*

*आहे तयारी हापूसवर बहिष्कार घालण्याची? तो घालून आंब्यांच्या अन्य पर्यायांचा शोध घेतलात, तर असं दिसेल की, रस-रंग-गंध-स्वादांची कल्पनातीत विविधता असलेली आम्रसृष्टी सभोवार आहे. तिचा आस्वाद न घेण्याचा करंटेपणाच आपण करीत आहोत. हापूसचा दुराग्रह सोडून बघणार ना यंदा ह्या वैविध्याकडे? तसं करून 'गतिमान संतुलना'कडे आपला अनुभव अवश्य कळवा.*

– संपादक

*गेल्या १३ एप्रिलला आम्हांला पुण्यातून कोकणात स्थानांतरित होऊन दहा वर्षं झाली. आपण निसर्गाच्या अधिक जवळ जाऊन राहावं; आपली जीवनशैली निसर्गाशी अधिक जवळीक साधणारी असावी अशा तीव्र इच्छेतून खेड्यात राहायला जाण्याचा निर्णय आम्ही घेतला. अन् आता दहा वर्षं इथे राहिल्यावर आम्ही निश्चितपणे 'ग्राम-स्थ' झालो आहोत असं म्हणता येईल. ह्या दहा वर्षांत आमची किती स्वप्नं पुरी झाली–किती अपुरी राहिली; आम्ही निसर्गस्नेही जीवनशैली आचरणात आणण्यात किती यशस्वी झालो–किती अयशस्वी ह्याचा मागोवा घेणारं हे नवं सदर :*

**स्वप्नामधील गावां...**

# आम्ही 'कोकण-स्थ' होतो!

**दिलीप**

शांता शेळके यांचं एक सुंदर गीत आकाशवाणीवर अधूनमधून लागतं : 'ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावां...'. आशानं गायलेलं हे गीत ऐकत असताना आपल्यापैकी प्रत्येकजण आपल्या मनात असलेल्या अशा एखाद्या स्वप्नातल्या गावात जात असतो. प्रत्येकाची स्वप्नं वेगळी, आणि त्यामुळे 'स्वप्नामधील गावां'त काय करायचं ह्याच्या कल्पनाही वेगळ्या असतात. पण ही सारी स्वप्नंच असतात : ती प्रत्यक्षात येतीलच ह्याची काहीच शाश्वती नसते. म्हणूनच की काय, गीताच्या शेवटच्या ओळीत शांताबाई म्हणतात : 'स्वप्नातल्या सुखांचा स्वप्नींच वेध घ्यावा'. न जाणो, स्वप्न वास्तवात येताना सुखाऐवजी दु:खच वाट्याला आलं तर!

पण आम्हांला मात्र स्वप्नातल्या सुखाचा वास्तवातच वेध घ्यायचा होता. 'स्वप्नामधील गावां' प्रत्यक्षात जायचं होतं. मी पर्यावरणाविषयी लिहीत होतो-बोलत होतो. पण मला नुसताच बोलघेवडा पर्यावरणवादी बनायचं नव्हतं. पर्यावरणाच्या समस्यांना आपण लिखाणातून जी उत्तरं दिली, ती जर आपण प्रत्यक्षात 'जगलो' नाही, तर आपण 'कोरडे पाषाण' होणार नाही का असं मला वाटे. अन् माझं वर्तन जर माझ्या सांगण्याच्या विरुद्ध असेल, 'कथनी' आणि 'करनी' ह्यांत अंतर असेल तर तो दांभिकपणाच नाही का असंही वाटे. मग कधी रामदास आठवत : 'आधी केले मग सांगितले असं झालं का' असं ते विचारताहेत असं वाटे. तसं तर फारसं झालं नव्हतं. पण निदान सांगतो तसं नंतर का होईना करावं असं वाटत होतं.

हे 'वाटणं' नेमकं काय होतं? आधी तेही थोडक्यात सांगितलं पाहिजे. पर्यावरण ह्या विषयाचा आवड म्हणून अभ्यास करता-करता मला असं जाणवायला लागलं होतं की, पर्यावरणाच्या साऱ्या समस्या ह्या एकाच मूळ कारणातून निर्माण झाल्या आहेत : अतिरेकी उपभोग. मानवाचा प्रमाणाबाहेर वाढलेला उपभोग हाच पर्यावरणाची सर्व प्रकारची हानी करण्यास कारण ठरत आहे : मग ते संसाधनांचे ऱ्हास असोत, प्रदूषणं असोत, की जैविक विविधतेतील घट. सर्वांचं कारण आहे माणसाची हाव. त्यामुळे जर काही करायला हवं असेल, तर ते म्हणजे ही हाव कमी करणं. 'गरजा' टाळता येत नाहीत, पण 'हाव' टाळता येते. त्यादृष्टीनं सजग प्रयत्न मात्र हवेत. ते नसतील तर चैनीही गरजा बनून जातात. म्हणून मला वाटायचं की, आपली जीवनशैली ही शक्य तेवढ्या कमी उपभोगाची हवी. पण म्हणून मला संन्यासीही व्हायचं नव्हतं. एक सामान्य कुटुंबवत्सल माणूस म्हणूनच मला असं जगायचं होतं. शहरात तसं घडणं एका मर्यादेपर्यंतच शक्य होतं, म्हणून खेड्यात जाऊन राहायचं होतं. निसर्गाशी अधिक जवळीक तिथे साधली जाणं शक्य होतं म्हणून.

विचार ह्या दिशेनं धाव घेत असताना प्रत्यक्षात मी फक्त एकच गोष्ट करू शकलो होतो : टेल्कोतली नोकरी सोडणं. मार्च १९८४ मधे मी ती नोकरी सोडली; आणि विवेकानंद केंद्राचा पूर्णवेळ कार्यकर्ता बनलो. ह्या कृतीला घरच्यांचा पूर्ण पाठिंबा होता असं नाही; पण अनिच्छेनं दिलेली अनुमती होती. त्यांच्या भावना समजण्याजोग्या आहेत. पाच वर्षं नोकरी

(पृष्ठ ४ वर)